सकाळ

# नूतन महाराष्ट्र महाविद्यालयात सायबर सुरक्षेबाबत जनजागृती

**भंडारा, ता. २६ :** क्विक हिल फाऊंडेशन सोबत सुरू झालेल्या सायबर सुरक्षाअंतर्गत येथील बं. ला. नूतन महाराष्ट्र महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांना जे. एम. पटेल कॉलेजच्या विद्यार्थिनींनी सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन केले.

मोबाईलचा वापर करत असताना इंटरनेट व सायबर सुरक्षित व सतर्क राहणे गरजेचे असते हे त्यांनी उदहारणासह पटवून दिले. सायबर वॉरिअर तनुश्री कुंभारे व ईशा तिबुडे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत इत्यंभूत माहिती देऊन स्वतःला व स्वतःच्या परिवाराला कसे सुरक्षित राहावे या बाबत मार्गदर्शन केले.



**भंडारा:** नूतन महाराष्ट्र विद्यालयात जनजागृती करताना ईशा तिबुडे, तनुश्री कुंभारे, सोबत विद्यार्थी व शिक्षक.

बं. ला. नूतन महाराष्ट्र महाविद्यालयच्या विद्यार्थ्यांना क्विक हिल फाऊंडेशनतर्फे उत्कृष्ठ व्यासपीठ मिळाले असल्याचे मुख्याध्यापक प्रा.घनश्याम तरोणे यांनी सांगितले. यासाठी फाऊंडेशनच्या अनुपमा काटकर व अजय शिर्के यांचे त्यांनी आभार मानले.

कार्यक्रमाचे आयोजन सर्व सहकारी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केली होती. सायबर वॉरियर तनुश्री कुंभारे व ईशा तिबुडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

Nagpur, Chandrapur-Today
27/08/2025 Page No. 5